# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई
## GOVERNMENT DENTAL COLLEGE AND HOSPITAL, MUMBAI.
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डीमेलो मार्ग, छ.शि.म.ट.स्थानका शेजारी, फोर्ट, मुंबई— ४०० ००१
St. George's Hospital Compound, P.D'mello Road, Near CST Station, Fort, Mumbai - 400 001.
Phone - 022 - 22620668 Email: deangdch_mumbai@yahoo.com Website : www. gdchmumbai.org

**मध्यवर्ती ग्रंथालय विभाग**

**EMAIL ID: - gdchmumbaicentrallibrary@gmail.com**


जा.क्र. शादंमवरुमुं/मध्य. ग्रंथा./ई-नियत. डाटाबेस वर्गणी-दरपत्रक-२०२५/१५५/३११३/२४, दि.२९/१२/२०२४.

**महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरून दरपत्रकाचे पत्र प्रसिद्धः-**

**प्रति,**

**महाविद्यालयीन संकेतस्थळ**

**विषय: सन २०२५ या वर्षाकरिता दंतशास्त्र विषयातील व मुलभूत वैद्यकीय विज्ञान विषयातील भारतीय व परकीय प्रकाशकांच्या ऑनलाईन ई-नियतकालिकांच्या (ई-संसाधनांच्या) डेटाबेसची वर्गणी (रक्कम) भरण्याकरिता/पुरवठाकरण्याकरिता दरपत्रक सादर करण्याबाबत...**

मा. महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस विनंती करण्यात येते कि, सन २०२५ या वर्षाकरिता भारतीय दंत परिषदेच्या मानकांची पूर्तता करण्यासाठी शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई या संस्थेच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागासाठी आवश्यक असलेल्या भारतीय व परकीय प्रकाशकांच्या ऑनलाईन ई-नियतकालिकांच्या (ई-संसाधनांच्या) डेटाबेसची वर्गणी (रक्कम) भरावयाची आहे.

या पत्राद्वारे आपणास सूचित करण्यात येते कि, ऑनलाईन ई-नियतकालिकांच्या (ई-संसाधनाच्या) डेटाबेसची वर्गणी भरण्याबाबतचे दरपत्रक भरण्यापूर्वी, या संस्थेच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागाने सदर दरपत्रकाच्या पत्रामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींचे प्रथम काळजीपूर्वक अवलोकन करून, ऑनलाईन ई-नियतकालिकांच्या (ई-संसाधनांच्या) डेटाबेस पुरवठादारांनी (आपण) आपले सीलबंद/मोहोरबंद दरपत्रक **मा. अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डीमेलो मार्ग, छ.शि.म.ट. स्थानका शेजारी, फोर्ट मुंबई-४००००१.** यांच्या नावे सादर करावे. जर ऑनलाईन ई-नियतकालिकांच्या (ई-संसाधनांच्या) डेटाबेस पुरवठादारांचे (आपले) सदरील दरपत्रक या संस्थेने/महाविद्यालयाने खाली नमूद केलेल्या अटी, शर्तींनुसार सादर करण्यात आले नाही तर, त्या ई-नियतकालिक पुरवठादाराचे (आपले) दरपत्रक तुलनात्मक तक्त्यासाठी ग्राह्य धरले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**महत्वाचे:- ऑनलाईन ई-नियतकालिकांच्या (ई-संसाधनांच्या) डेटाबेसची वर्गणी (रक्कम) भरण्याकरिता/पुरवठा करण्याकरिता पुरवठादारास (आपणास) आदेश दिल्यास ऑनलाईन ई-नियतकालिकांच्या (ई-संसाधनांच्या) डेटाबेसच्या देयकाची रक्कम या संस्थेकडून कधी/ केंव्हा हवी आहे, त्याबाबत जर आपले काही म्हणने असल्यास, त्याबाबत दरपत्रकामध्ये इतर अटी, शर्तींमध्ये स्पष्टपणे नमूद करावे.**

❖ **<u>ऑनलाईन ई-नियतकालिके (ई-संसाधने) डेटाबेसची वर्गणी (रक्कम) संबंधित प्रकाशकास/संबंधितास भरण्याकरिता या महाविद्यालयातील मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या दृष्टीने तसेच शासन निर्णय क्र. वैशिवि-२०१७/प्र.क्र. ३१३-भाग-२/प्रशा-२ दि. ०८/११/२०१७ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार गैरव्यवहारांना आळा घालण्याच्या दृष्टीने सूचित केल्याच्या अनुषंगाने दरपत्रक खालील अटी व शर्ती नुसार या संस्थेत/महाविद्यालयात सादर करण्यात यावेत.</u>**

1. सन २०२५ या वर्षासाठी ऑनलाईन ई-नियतकालिके (ई-संसाधने) डेटाबेसचा कालावधी युजर आय.डी. पासवर्ड दिल्यापासून ३६५ दिवस दिवसांचा किंवा १ वर्षाचा (१२ महिन्यांचा) इतका असावा. तत्पूर्वी आपणास आपल्या सदर डेटाबेसचे सदस्यत्व रद्द करता येणार नाही.
2. पुरवठादार (आपण) पुरवठा करत असलेल्या ऑनलाईन ई-नियतकालिके (ई-संसाधने) डेटाबेसमध्ये मुलभूत वैद्यकीय विज्ञान विषयाची/अभ्यासक्रमाची ई-नियतकालिके तसेच दंतशास्त्र विषयाची/अभ्यासक्रमाची ई-नियतकालिके असणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही विषयाची ई-नियतकालिकांची यादी नमूद करण्यात येऊ नयेत व इतर विषयांची ई-नियतकालिकांचा पुरवठा करण्यात येऊ नये.
3. या संस्थेतून ऑनलाईन ई-नियतकालिके (ई-संसाधने) डेटाबेस पुरवठा करण्याकरिता आदेश आपणास दिल्यापासून किंवा सदर ई-नियतकालिके (ई-संसाधने) डेटाबेसची वर्गणी (रक्कम) अदा केल्यानंतर संस्थेच्या नावे असलेला युजर आय.डी. पासवर्ड मध्यवर्ती ग्रंथालय विभागास त्वरित द्यावा लागेल.
4. आपल्या सदर ऑनलाईन ई-नियतकालिके (ई-संसाधने) डेटाबेसचे वेळोवेळी प्रशिक्षण (Training) देणे आपणास बंधनकारक राहील.
5. पुरवठादाराने (आपण) आपल्या ई-नियतकालिके डेटाबेसच्या दरपत्रकासोबत सदर डेटाबेस अंतर्गत पुरवठा करण्यात येणाऱ्या ई-नियतकालिकांची यादी पुरवणे आवश्यक आहे. तसेच आपण पुरवठा करणार असलेल्या यादीमध्ये फुल टेक्स्ट आर्टिकल्स (Full Text Articles) असणे आवश्यक आहे.
6. वर नमूद केल्याप्रमाणे वर्गणी (रक्कम) आकारून पुरवठा करण्यात येणारी ई-नियतकालिके कोणती आहेत. व ओपन ॲक्सेस (विनाशुल्क/मोफत उपलब्ध असणारी) ई-नियतकालिके कोणती आहेत ते स्पष्टपणे नमूद करण्यासाठी सदर दरपत्रकासोबत प्रकाशकनिहाय i) वर्गणी शुल्क (रक्कम) आकारण्यात येणार आहे अशा ई-नियतकालिकांची यादी व ii) ओपन ॲक्सेस ई-नियतकालिके डेटाबेस फुल टेक्स्ट आर्टिकल असलेल्या ई-नियतकालिकांची यादी अशा दोन वेगवेगळ्या याद्या दरपत्रकासोबत स्वतंत्ररीत्या जोडण्यात याव्यात (ओपन ॲक्सेस ई-नियतकालिके यांच्यासाठी कोणत्याही प्रकारची वर्गणी (रक्कम) आकारण्यात येऊ नये).
7. वर नमूद केल्याप्रमाणे ई-नियतकालिक डेटाबेसच्या फुल टेक्स्ट आर्टिकल्स (Full Text Articles) साठी प्रकाशकनिहाय किती एम्बार्गो पिरीयड (Embargo Period) असणार आहे याबाबत सविस्तर माहिती स्पष्टपणे नमूद करण्यात यावी. आपल्या सदर ई-नियतकालिके डेटाबेसच्या फुल टेक्स्ट आर्टिकल्स (Full Text Articles) साठी प्रकाशकनिहाय किती एम्बार्गो पिरीयड (Embargo Period) आहे याबाबत देण्यात येणाऱ्या माहितीमध्ये तफावत आढळल्यास किंवा सदरबाबत पूर्तता न केल्यास आपणास देण्यात आलेले आदेश रद्द करण्यात येतील. व देयकात नमूद केल्याप्रमाणे सदर ई-नियतकालिकांची देण्यात आलेली वर्गणी (रक्कम) त्वरित परत करणे आपणावर बंधनकारक राहील.
8. संस्थेतील प्राध्यापक वर्ग, पदव्युत्तर विद्यार्थीवर्ग आणि पदवीपूर्व विद्यार्थीवर्गाच्या सोयीसाठी रिमोट ॲक्सेस लॉगीन ही सुविधा पुरविण्यात यावी. तसेच संस्थेचा आय.पी. ॲड्रेस (IP Address) नमूद करून त्यानुसार या संस्थेच्या नावे सदस्यत्व देणे आपणावर बंधनकारक राहील.
9. पुरवठादारामार्फत पुरवठा केल्या जाणाऱ्या ई-नियतकालिके डेटाबेस दरपत्रकासोबत देण्यात आलेल्या यादीत नमूद केलेल्या ई-नियतकालिकांचा पुरवठा नमूद केलेल्या सदस्यत्व कालावधीत मध्येच खंडित करण्यात येऊ नये.
10. तसेच प्रस्तुत प्रकरणी पुरवठादार (आपण) दरपत्रकासोबत पुरवत/नमूद करत असलेल्या ई-नियतकालिकांच्या यादीप्रमाणे पुरवठा करण्यात येणाऱ्या ई-नियतकालिकांचा सदस्यत्व कालावधी

(Subscription Period) संपल्यानंतर, या महाविद्यालय/संस्थेमार्फत खरेदी करण्यात आलेल्या/सदस्यत्व घेण्यात आलेल्या कालावधीतील ई-नियतकालिके या महाविद्यालयातील वाचकवृंदाना पुरवणे अथवा या महाविद्यालय/संस्थेमार्फत खरेदी करण्यात आलेल्या/सदस्यत्व घेण्यात आलेल्या कालावधीतील ई-नियतकालिकांचा परपेचुअल ॲक्सेस (Perpetual Access) या महाविद्यालास/संस्थेस पुरवणे/देणे आपणास बंधनकारक राहील. ई-नियतकालिकांच्या परपेचुअल ॲक्सेसबाबत पुरवठादारामार्फत/आपणामार्फत देण्यात येणाऱ्या माहितीमध्ये व आपण दिलेल्या सेवेमध्ये तफावत आढळून आल्यास किंवा सदरबाबत पूर्तता न केल्यास आपणास देण्यात आलेले आदेश रद्द करण्यात येतील. व देयकात नमूद केल्याप्रमाणे सदर ई-नियतकालिकांची देण्यात आलेली वर्गणी (रक्कम) त्वरित परत करणे आपणावर बंधनकारक राहील.

11. आपणास आदेश दिल्यानंतर या महाविद्यालयाकडून ई-नियतकालिकांच्या यादीतील फुल टेक्स्ट आर्टिकल ओपन होत नसेल किंवा काही कारणास्तव काही ई-नियतकालिके अभ्यासक्रमासाठी ओपन होत नसतील किंवा अन्य काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास त्या सर्व बाबींचा निपटारा या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागाने ई-मेलद्वारे, संबंधितास दूरध्वनी/भ्रमणध्वनी द्वारे किंवा पत्रव्यवहाराद्वारे कळविल्यास आपण सदरची अडचण/समस्या/तक्रार त्वरित दूर करून सदरचे ई-नियतकालिक वाचकवृंदाना उपलब्ध करून देणे आपणावर बंधनकारक राहील. या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागाने ई-मेलद्वारे, संबंधितास दूरध्वनी/भ्रमणध्वनी द्वारे किंवा पत्रव्यवहाराद्वारे कळविल्यास आपणाकडून सदरची अडचण/समस्या/तक्रार त्वरित दूर न झाल्यास आपल्याला या महाविद्यालयाला त्वरित भेट (Visit) देऊन अडचण/समस्या/तक्रारीचे निवारण करणे बंधनकारक राहील.
12. या महाविद्यालयास आवश्यक असणाऱ्या ई-नियतकालिकांच्या पुरवठ्याचे आदेश दिल्यानंतर सदर ई-नियतकालिकांची रक्कम संबंधित प्रकाशकास भरल्यानंतर सबस्क्रिप्शन आय.डी. (Subscription ID) देणे, तसेच प्रकाशकास वर्गणी (रक्कम/पैसे) दिल्याबाबातचे बँक रेमिन्टन्स सादर करणे तसेच आपणाकडून या महाविद्यालयाच्या नावे ई-नियतकालिकांची वर्गणी रक्कम मिळाल्याबाबत संबंधित प्रकाशकाने आपणास दिलेली/मिळालेली पोहोच या महाविद्यालयास/महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालयास देणे आपणावर बंधनकारक राहील.
13. वर नमूद केल्याप्रमाणे गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली यांच्या अटी, शर्तीच्या व दि. ०८/११/२०१७ रोजीच्या च्या शासन निर्णयाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास आवश्यक असलेल्या ई-नियतकालिकांच्या पुरवठ्याच्या हिशोबाबाबत मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या दृष्टीने ई-नियतकालिकांच्या एकूण आदेशाच्या रक्कमेच्या ५% सुरक्षा अनामत रक्कम म्हणून बँक गॅरंटी या महाविद्यालयाच्या नावे सन जाने. २०२५ ते सन जून. २०२६ या दीड वर्षाच्या कालावधीसाठी द्यावी लागेल. तसेच सदरील रक्कमेची बँक गॅरंटी राष्ट्रीयकृत बँकेची (Nationalise Bank) असणे बंधनकारक असून या महाविद्यालयास/संस्थेस जमा करणे आवश्यक आहे.
14. या महाविद्यालयाच्या/संस्थेच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास आवश्यक असलेल्या नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) भरण्याकरिता ई-नियतकालिक पुरवठादारास आपणास आदेश दिल्यानंतर संबंधित त्या त्या प्रकाशकाकडे ई-नियतकालिकांच्या/ई-नियतकालिके डेटाबेसच्या अनुषंगाने या महाविद्यालयाच्या/संस्थेच्या नावाने प्रस्तुत प्रकरणी पत्रव्यवहार/ई-मेल करणे आपणावर बंधनकारक असून, प्रस्तुत प्रकरणीच्या अधिक माहितीकरिता मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या अधिकृत ई-मेल आय.डी.वर प्रस्तुत पत्रव्यवहाराची/ई-मेलची प्रत किंवा ई-मेलची सी.सी./कार्बन कॉपी (e-mail CC/Carbon Copy) करणे आवश्यक आहे.
15. ऑनलाईन ई-नियतकालिके (ई-संसाधने) डेटाबेस पुरवठादार यांच्या फर्मची (आपली) जीएसटी (GST) बाबतची शासनाकडे नोंदणी असलेल्या प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.
16. सदर ई-नियतकालिक पुरवठादार यांची गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली यांच्याकडे सभासदत्व असणे/मान्यता प्राप्त सदस्य असणे गरजेचे आहे.

17. या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या व गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली यांच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने ई-नियतकालिक पुरवठादारास ई-नियतकालिकांची वर्गणी प्रकाशकास भरण्याकरिता/पुरवठा करण्याकरीताचे आदेश दिल्यानंतर, नियतकालिकांच्या पुरवठ्या संबंधी सदर दरपत्रकात व आदेशात नमूद केलेल्या अटी, शर्ती संबंधित ई-नियतकालिक पुरवठादारास रु. ५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त) रुपयांच्या मुद्रांक कागदावर (स्टॅम्प पेपरवर) हमीपत्र/करारपत्र देयकासोबत सादर करणे ई-नियतकालिक पुरवठादारावर (आपणावर) बंधनकारक आहे.

18. या संस्थेस सीलबंद/मोहोरबंद दरपत्रक सादर करताना/पाठविताना पाकिटावर/लिफाफ्यावर **<u>प्रति, मा. अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डीमेलो मार्ग, छ.शि.म.ट. स्थानका शेजारी, फोर्ट, मुंबई-४००००१.</u>** असा ठळक अक्षरात पत्ता नमूद करावा.

19. तसेच सीलबंद/मोहोरबंद लिफाफ्यावर **<u>"सन २०२५ या वर्षाकरिता ऑनलाईन ई-नियतकालिके (ई-संसाधने) डेटाबेसची वर्गणी (रक्कम) भरण्याकरीताचे दरपत्रक"</u>** असे ठळक अक्षरात नमूद करावे. सदरहू सीलबंद/मोहोरबंद दरपत्रक या कार्यालयास **दि.३१/१२/२०२४** रोजी पर्यंत **संध्याकाळी ५:००** वाजेपर्यंत पोहोच करावे. तदनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

20. तसेच सदरचे दरपत्रक **<u>भारतीय डाक सेवेमार्फत किंवा हस्तबटवड्याने किंवा कुरिअर सेवेमार्फत दि.३१/१२/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी या संस्थेच्या कार्यालयात प्राप्त झाल्यास आपले दरपत्रक ग्राह्य धरले जाईल.</u>** अन्यथा तदनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

21. कोणत्याही ऑनलाईन ई-नियतकालिके (ई-संसाधने) डेटाबेस पुरवठादाराचे या संस्थेस ई-मेलद्वारे पाठविण्यात/सादर करण्यात आलेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाही.

❖ **<u>दरपत्रकासोबत खालील नमूद केलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांची/दस्तऐवजांची छायांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे.</u>**

1. पॅनकार्डची छायांकित प्रत. तसेच जे ई-नियतकालिक पुरवठादार या पत्रात नमूद केल्याप्रमाणे अटी, शर्तीनुसार सदरचे दरपत्रक या महाविद्यालयास सादर करणार आहेत. त्यांच्या पॅनकार्डची छायांकित प्रत दरपत्रकासोबत सादर करणे अनिवार्य असल्यामुळे, ज्यांचे पॅनकार्ड फर्मच्या नावे नसेल, त्यांनी ज्यांच्या नावे पॅनकार्ड आहे, त्यांचे व फर्म यांच्याबाबत आवश्यक असणारे दस्तऐवज दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.
2. मागील सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ (Assessment Year 2024-25) या कालावधीचे आयकर परतावा/निपटारा विवरणपत्र/प्रमाणपत्र (Income Tax Return Acknowledgement) ची छायांकित प्रत.
3. जीएसटी (GST) बाबतची शासनाकडे नोंदणी असलेल्या प्रमाणपत्राची प्रत.
4. सदर ई-नियतकालिक पुरवठादार यांची गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली यांच्याकडे सभासदत्व असणे/मान्यता प्राप्त सदस्य असणे गरजेचे आहे.
5. सदर ई-नियतकालिक पुरवठादार (आपण) हा त्या त्या प्रकाशकाचा विशेषतः/मान्यताप्राप्त एजंट/पुरवठादार (Exclusive/Authorised Agent) असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र अथवा कागदपत्रे/दस्तऐवजांची छायांकित प्रती जोडण्यात याव्यात.
6. प्रस्तुत प्रकरणी ज्या बँकेमार्फत व्यवहार केला जातो किंवा करणार आहे त्या बँकेचे नाव आणि पूर्ण पत्ता व ई-मेल आय.डी. सह माहिती किंवा इतंभूत माहिती असलेली प्रत.
7. आपण ई-नियतकालिकांचा पुरवठा इतर कोणत्या संस्थेत करत असल्यास त्या संस्थेच्या नावाची यादी व त्या संस्थेकडून आपणास प्रस्तुत प्रकरणी देण्यात आलेल्या आदेशाच्या छायांकित प्रती जोडण्यात याव्यात.
8. इतर कागदपत्रे.

❖ **वर नमूद केल्याप्रमाणे गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली व या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या अटी, शर्तीच्या अनुषंगाने, सन २०२५ या वर्षाच्या ई-नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) संबंधित प्रकाशकास भरण्याकरिता/या महाविद्यालयाचे आदेश मिळविण्याकरिता/सदस्यत्वाकरिता, खालील मुद्द्यांसमोर ई-नियतकालिक पुरवठादाराने (आपण) आपल्या अटी, शर्ती मुद्देनिहाय स्पष्टपणे दरपत्रकामध्ये नमूद करण्यात याव्यात.**

1. वर्गणी (रक्कम) आकारून पुरवठा करण्यात येणाऱ्या ई-नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) भारतीय व परकीय प्रकाशकास भरण्याबाबत:-
2. प्रकाशकाने ई-नियतकालिकांची किंमत सन २०२५ या वर्षाकरिता प्रकाशित केल्यानंतर प्रकाशकाने मध्येच किंमत वाढवली तर किंवा इतर बाबीकरिताच्या पुरवणी देयकाबाबत:-
3. पुरवठादाराकडे (आपल्याकडे) उपलब्ध असलेल्या/आपण पुरवठा करु शकता अशा ऑनलाईन ई-नियतकालिके (ई-संसाधने) डेटाबेसमध्ये मुलभूत वैद्यकीय विज्ञान विषयाची/अभ्यासक्रमाची ई-नियतकालिके तसेच दंतशास्त्र विषयाची/अभ्यासक्रमाची ई-नियतकालिके सदर आपल्या दरपत्रकामध्ये असणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही विषयाची ई-नियतकालिकांची यादी नमूद करण्यात येऊ नयेत व इतर विषयांच्या ई-नियतकालिकांचा पुरवठा करण्यात येऊ नये. अ) तरी सदर दरपत्रकासोबत प्रकाशकनिहाय वर्गणी शुल्क आकारण्यात येणार आहे अशा फुल टेक्स्ट आर्टिकल असलेल्या ई-नियतकालिकांची यादी विहित रकान्यात भरण्यात यावी.

| अनु. क्र. | प्रकाशकाचे नाव | ई-नियतकालिकाचे नाव | परकीय/ भारतीय | खंड क्र. | एकूण अंक | ई-नियतकालिक प्रकाशित होणारा महिना | ई-नियतकालिकाची किंमत (परकीय/भारतीय चलन) | विनिमय दर | रुपयामध्ये एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

ब) तरी सदर दरपत्रकासोबत प्रकाशकनिहाय ओपन अॅक्सेस ई-नियतकालिके फुल टेक्स्ट आर्टिकल असलेल्या ई-नियतकालिकांची यादी खालील विहित रकान्यात भरण्यात पुरविण्यात यावी.

| अनु. क्र. | प्रकाशकाचे नाव | ई-नियतकालिकाचे नाव | भारतीय/परकीय | खंड क्र. | एकूण अंक | ई-नियतकालिक प्रकाशित होणारा महिना |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

4. गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली व या महाविद्यालयाच्या अटी, शर्तीनुसार जर पुरवठादार (आपण) ई-नियतकालिकांचा पुरवठा जर पॅकेज स्वरुपात करत/करणार असाल तर वर नमूद केलेल्या मुद्दा क्र. ३ मधील अ) आणि ब) प्रमाणे पुरवठादार (आपण) नमूद करणार असलेल्या ई-नियतकालिकांच्या यादीतील कोणती ई-नियतकालिके पॅकेज स्वरुपात पुरवणार आहात व पॅकेजची वर्गणी (रक्कम) काय असणार आहे याबाबत माहिती खालील विहित रकान्यात भरण्यात/पुरविण्यात यावी.

| अनु. क्र. | प्रकाशकाचे नाव | ई-नियतकालिकाचे नाव | भारतीय/परकीय | सबस्क्रिप्शन/ओपन अॅक्सेस | खंड क्र. | एकूण अंक | ई-नियतकालिक प्रकाशित होणारा महिना | ई-नियतकालिकाची किंमत (परकीय/भारतीय चलन) | विनिमय दर | रुपयामध्ये एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | एकूण किंमत | |
| | | | | | | | | | पॅकेजची एकूण किंमत | |

5. मुलभूत वैद्यकीय वैद्यकीय विज्ञान विषयाची/अभ्यासक्रमाची आणि दंतशास्त्र विषयाची/अभ्यासक्रमाची काही ई-नियतकालिके हि सोसायटी मार्फत प्रकाशित केले जातात. प्रस्तुत प्रकरणी जर आपण यादीत नमूद केलेल्या ई-नियतकालिकांव्यतिरिक्त महाविद्यालयातील प्राध्यापकांनी शिफारस केल्यास, काही ई-नियतकालिके जी सोसायटी मार्फत प्रकाशित केली जातात अशा ई-नियतकालिकांचा पुरवठादार (आपण) पुरवठा करणार आहे किंवा नाही त्याबाबत:-
6. सदर दरपत्रकाच्या पत्रामध्ये नमूद केलेल्या अटी, शर्तीच्या अनुषंगाने ई-नियतकालिक डेटाबेसच्या फुल टेक्स्ट आर्टिकल्स (Full Text Articles) साठी सविस्तर माहिती स्पष्टपणे नमूद करणे अनिवार्य असल्याने प्रकाशकनिहाय किती एम्बार्गो पिरीयड (Embargo Period) असणार आहे त्याबाबत:-
7. या महाविद्यालयाच्या/संस्थेच्या अटी, शर्ती मुद्दा क्र. १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे पुरवठादार/आपण परपेचुअल ॲक्सेस (Perpetual Access) या महाविद्यालयास/संस्थेस देणार आहे किंवा नाही त्याबाबत:-
8. वर नमूद केल्याप्रमाणे गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली यांच्या अटी, शर्तीच्या व दि. ०८/११/२०१७ रोजीच्या च्या शासन निर्णयाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास आवश्यक असलेल्या ई-नियतकालिकांच्या पुरवठ्याच्या हिशोबाबाबत मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या दृष्टीने ई-नियतकालिकांच्या एकूण आदेशाच्या रक्कमेच्या ५% सुरक्षा अनामत रक्कम म्हणून बँक गॅरंटी या महाविद्यालयाच्या नावे सन जाने. २०२५ ते सन जून. २०२६ या दीड वर्षाच्या कालावधीसाठी द्यावी लागेल. तसेच सदरील रक्कमेच्या बँक गॅरंटी राष्ट्रीयकृत बँकेची (Nationalise Bank) असणे बंधनकारक असून या महाविद्यालयास जमा करणे आवश्यक आहे. तसेच ई-नियतकालिकांच्या एकूण आदेशातील ई-नियतकालिकांचा पुरवठा प्रकाशकाने प्रकाशित केल्यानंतर विहित कालावधीमध्ये पूर्ण न केल्यास/झाल्यास किंवा अन्य काही कारणास्तव पुरवठा न झाल्यास/या महाविद्यालयाच्या नावे संबंधित प्रकाशकास ई-नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) वेळेत न भरल्याचे निदर्शनास आल्यास वर नमूद केल्याप्रमाणे ई-नियतकालिकांच्या एकूण आदेशाच्या ५% रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून जी बँक गॅरंटी या महाविद्यालयाकडे जमा करण्यात येणार आहे/आलेली आहे ती सर्व ५% असलेली बँक गॅरंटीची रक्कम दंडात्मक कारवाई म्हणून कपात करण्याबाबत:-
9. या महाविद्यालयास आवश्यक असणाऱ्या ई-नियतकालिकांच्या पुरवठ्याचे आदेश दिल्यानंतर सदर ई-नियतकालिकांची रक्कम संबंधित प्रकाशकास भरल्यानंतर सबस्क्रिप्शन आय.डी. बाबत प्रकाशकास वर्गणी (रक्कम/पैसे) दिल्याबाबतचे बँक रेमिन्टन्स तसेच आपणाकडून या महाविद्यालयाच्या नावे ई-नियतकालिकांची वर्गणी रक्कम मिळाल्याबाबत संबंधित प्रकाशकाने आपणास दिलेली/मिळालेली पोहोचबाबत प्रस्तुत कागदोपत्री इतंभूत माहितीबाबत:-
10. वर नमूद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त, ई-नियतकालिकांचा (ई-संसाधनांचा) पुरवठा करण्याकरिता आपले दरपत्रक मान्य करण्यात आल्यास व या प्रस्तुत प्रकरणी आदेश दिल्यास आपल्या सदर ऑनलाइन ई-नियार्कालीके (ई-संसाधने) डेटाबेसचे वेळोवेळी प्रशिक्षण (Training) देणेबाबत:-
11. ई-नियतकालिकांच्या पुरवठ्याबाबत या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास भेट (Visit) देणेबाबत किंवा इतर सेवा देणेबाबत:-
12. वर नमूद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त, ई-नियतकालिके (ई-संसाधने) डेटाबेस पुरवठादारच्या (आपल्या) अजून काही इतर अटी, शर्ती असल्यास त्याबाबत नमूद करावे.

आपण सादर केलेले दरपत्रक स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार खाली स्वाक्षरी करणार मा. अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहेत.

अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई.